दिनांक  07/11/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 168

विषय - शासन निर्णय परिपत्रक क्र. राअस/मैला व्यवस्थापन नरीमन पॉइंट मुंबई 400021/1139 / 2022 दिनांक 30/11/2022 नुसार विटा नगरपरिषद येथे Scheduled Desludging ची अंमलबजावणी करणेसाठी मैला व्यवस्थापन शुल्क आकारणेबाबत केलेला ठराव क्र.5 दि.20/04/2023 हा रद्द करुन त्यामधील उपयोगिता शुल्क 1 टक्के  ऐवजी 2 टक्के लावणेबाबतचा नवीन ठराव घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ - 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 03/11/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ – 2011/प्र.क्र. 124/नवि – 34 – दि. 8 नोव्हेंबर 2019

3) शासन निर्णय परिपत्रक क्र. राअस/मैला व्यवस्थापन नरीमन पॉइंट मुंबई 400021/ 1139/2022 दिनांक 30/11/2022

4) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ – 2022/ प्र.क्र. 178/नवि – 34 – दि. 19 डिसेंबर 2022

5) विटा नगरपरिषद दिनांक 27/12/2022 रोजीचा प्रशासकीय ठराव

6) विटा नगरपरिषद दिनांक 20/04/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव

7) दिनांक 10/10/2023 रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे मा. सह आयुक्त नगरपालिका प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमधील सूचना

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) 15 मे 2022 पासून महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. दिनांक 1 ऑक्टोबर 2017 रोजी महाराष्ट्राचा संपूर्ण नागरी भाग हागणदारीमुक्त घोषीत करण्यात आला आहे. हा दर्जा टिकवून ठेवणे तसेच राज्यातील नागरिकांना शौचालयांच्या चांगल्या सुविधांसह शहरांमधील शौचालयांच्या सेप्टिक टँक मधील मैल्याचे सुरक्षित व नियमित व्यवस्थापन करून त्यावर प्रक्रिया करून या शहरांना “ODF++” दर्जा प्राप्त करण्याच्या उद्देशाने राज्य शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ – 2011/ प्र.क्र. 124 /नवि – 34 – दि. 8 नोव्हेंबर 2019 नुसार राज्यातील 311 शहरांमध्ये मैला प्रक्रिया केंद्र (Faecal Sludge Treatment Plant) उभारणी करण्यास मान्यता दिली आहे. तसेच, शासन निर्णय, नगर विकास विभाग, दि. 21 मार्च 2022 अन्वये ज्या शहरांकडे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Sewage Treatment Plant) अथवा मैला प्रक्रिया प्रकल्प (FSTP) नाही अशा शहरांना मैल्यावर सहप्रक्रिया करण्याकरिता लगतच्या शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) मध्ये  सहप्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

पान नं.2 वर

शहरांमध्ये सेप्टिक टँक मध्ये जमा झालेल्या मैल्यावर प्रक्रिया करण्यासाठी नियमित पद्धतीने तो मैला उपसा करणे गरजेचे आहे.

संदर्भ क्र. 3 नुसार स्वच्छ भारत अभियान 2.0 च्या मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यातील १ लाखापेक्षा कमी लोकसंख्येच्या सर्व शहरांनी ODF++ व किमान 50% शहरांनी (सर्व महानगरपालिका सहित) Water+ दर्जा अभियान कालावधीत प्राप्त करावयाचा आहे. ODF++ आणि Water+ टूलकिटच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ODF++ आणि Water+ प्रमाणीकरण प्राप्त करण्याकरिता तीन वर्ष्यांतून एकदा शहरातील सेप्टिक टँक खाली करणे अनिवार्य आहे.

सेप्टिक टँक उपसा करण्यासाठी THE PROHIBITION OF EMPLOYMENT AS MANUAL SCAVENGERS AND THEIR REHABILITATION ACT, 2013 अन्वये हाताने किंवा सफाई कर्मचाऱ्यामार्फत मैला उपसणे हा गुन्हा आहे. त्यामुळे सेप्टिक टँक उपसा करण्यासाठी यंत्रसामग्रीचा म्हणजे मैला गाडीचा उपयोग करणे आवश्यक आहे. तसेच कुठल्याही परिस्थितीमध्ये संदर्भधिन कायदा नियम व केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत.

संदर्भ क्र. 3 नुसार मैला उपसा निर्धारित वेळेप्रमाणे करण्यासाठीची कार्यपद्धती नुसार खालील सूचना प्राप्त आहेत.

1. शहरात ज्या भागात सांडपाणी व्यवस्था उपलब्ध नाही अशा भागांचे सर्वेक्षण करून सेप्टिक टँकची संख्या सुनिश्चित करावी. सर्वेक्षण करत असताना घर क्रमांक, वैयक्तिक शौचालय आहे की नाही, वैयक्तिक शौचालय हे सेप्टिक टँकला जोडलेले आहे की नाही याबाबत नोंद घ्यावी. तसेच सेप्टिक टँकच्या ठिकाणास Geo tagging करून Google earth वर स्थापित करून त्याचा नकाशा बनवावा. यासाठी महानगरपालिका, नगरपरिषदा यांना घरपट्टी, पाणीपट्टी, मालमत्ता कराच्या रेकॉर्डचा वापर करता येईल.
2. सेप्टिक टँकची संख्या सुनिश्चित केल्यानंतर प्रतिवर्षी शहरातील एकूण सेप्टिक टँक पैकी किमान 33% सेप्टिक टँक उपसा केले जातील अशाप्रकारे नियोजन करावे.
3. THE PROHIBITION OF EMPLOYMENT AS MANUAL SCAVENGERS AND THEIR REHABILITATION ACT, 2013 अन्वये हाताने किंवा सफाई कर्मचाऱ्यामार्फत मैला उपसला जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. यासाठी तात्रिक पद्धतीने म्हणजेच यांत्रिकी मैला गाडीच्या सहाय्याने सेप्टिक टँकचा उपसा करावा. शहरामध्ये निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टिक टँक उपसा (Scheduled Desludging) सुरु झालेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्याचे लॉगबुक बनवून त्यामध्ये नियमित नोंद घेण्यात यावी.
4. सेप्टिक टँकचा उपसा तीन वर्षांच्या निर्धारित कालावधीत करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामग्री व मनुष्यबळाचे मुल्यमापन करावे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध असलेल्या साधनसामग्री व मनुष्यबळाची गणना करण्यात येऊन अतिरिक्त लागणाऱ्या साधनसामग्री व मनुष्यबळाची निश्चिती करावी.

पानं नं.3 वर

5. अतिरिक्त लागणाऱ्या साधनसामग्री व मनुष्यबळासाठी शहरातील बचत गट/सफाई कामगार यांचे गट अथवा खाजगी संस्था यांची या कामासाठी नेमणूक विहित कार्यपद्धतीने केली जाऊ शकते. बचत गटांना या कामासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध होण्याकरिता बँकेद्वारे कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी मदत करावी. तसेच NSKFDC (National Safai Karmachari Finance and Development Corporation) द्वारे त्यांना कर्ज उपलब्ध करून देता येईल.

6. संदर्भ क्र. 3 मधील मुद्दा क्र. 6 नुसार

अ) निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टिक टँक उपसा व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था स्वनिधीचा वापर करू शकतात.

ब) तसेच स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्याकडे सद्यस्थितीत आकारण्यात येत असलेल्या मालमत्ता कराद्वारे किंवा मैला व्यवस्थापन कराला मालमत्ता कराचा भाग बनवून त्याद्वारे, सेप्टिक टँक उपसा करणे व मैला प्रक्रिया केंद्र चालविणे याकरिताचा वापर शुल्क बंधनकारक करू शकतात किंवा सेप्टिक टँक उपसा करण्यासाठीचे व मैला प्रक्रिया केंद्र चालविण्याकरिता आकारण्यात येणारे उपयोगिता शुल्क, मालमत्ता कराद्वारे भागवता येईल असे नमूद आहे.

वरील संदर्भ क्र. 3 मधील नमूद कार्यपद्धती मधील मुद्दा क्र. 1 ते 5 पर्यंतची नगरपरिषद मार्फत पूर्तता करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. 2 मधील नमूद कार्यपद्धती मधील मुद्दा क्र. 6 नुसार उपयोगिता शुल्क आकारण्यासाठी महाराष्ट्र न 3रपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 नुसार योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र.5 नुसार CWAS, CRDF-CEPT विद्यापीठ अहमदाबाद यांनी विटा शहरात सांडपाणी, पाणीपुरवठा व घनकचरा व्यवस्थापन बाबत विटा नगरपरिषदेस तांत्रिक सहाय्य पुरवीत आहेत. दिनांक 17/03/2023 रोजी केलेल्या सादरीकरणानुसार नगरपरिषदेच्या सर्व रहिवासी मालमत्ता यांना प्रमाणात (Percentage based) कर लावण्याची शिफारस आहे. याबाबत CEPT यांच्या नुसार मालमत्ता कराच्या करयोग्य मूल्याच्या 1% या प्रमाणात उपयोगिता शुल्क लावणेस प्रस्तावित आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल CRDF-CEPT विद्यापीठ मार्फत सादर करण्यात आला आहे.

संदर्भ क्र. 6 मधील विटा नगरपरिषदेच्या दि. 20/04/2023 चे ठराव क्र.5 नुसार निर्धारित वेळापत्रकानुसार सेप्टिक टँक उपसा व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगिता शुल्क आकारण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. सदरच्या ठरावानुसार विटा नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 चे प्रकरण 9 मधील तरतुदीस अनुसरून नगरपरिषद हद्दीच्या क्षेत्रामध्ये सर्व निवासी,अनिवासी, औद्योगिक,मिश्र इत्यादी प्रकारच्या मालमत्तेची कर आकारणी करयोग्य मूल्यावर निर्धारित करण्यात येते, त्यामुळे CEPT नुसार महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 चे कलम 114 नुसार निर्धारित केलेल्या करपात्र असणाऱ्या करयोग्य मूल्यावर ज्या मिळकतींना शौचालय उपलब्ध आहे.

पानं नं.4 वर

तसेच त्या नंतर ज्या नवीन मिळकती निर्माण झाल्या आहेत व ज्यांना सेप्टिक टँकसह शौचालय उपलब्ध आहे अशा सर्व मिळकतींना कलम 108 मधील तरतूद नुसार, कलम 114 नुसार निर्धारित केलेल्या करपात्र असणाऱ्या करयोग्य मूल्यावर एक टक्के (1%) प्रमाणे उपयोगिता शुल्क लावण्यास मंजुरी मिळाली आहे.

परंतु, संदर्भ क्र. 7 मधील दिनांक 10/10/2023 रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे मा. सह आयुक्त नगरपालिका प्रशासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मिटिंगमध्ये सह आयुक्त यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे विटा नगरपरिषद हद्दीमध्ये दर तीन वर्षांतून एकदा सेप्टिक टँक उपसा करण्यासाठी येणारा वार्षिक खर्च अंदाजे 45 लक्ष इतका आहे व करवाढीतून येणारे (करयोग्य मूल्यावर एक टक्के (1%) प्रमाणे) उत्पन्न हे केवळ 15,86,196/- रुपये आहे, सदरचे उत्पन्न खर्चाच्या तुलनेत खूप कमी असल्यामुळे भविष्यात नगरपरिदेच्या स्वनिधीवर अतिरिक्त बोजा पडण्याची शक्यता आहे, म्हणून सेप्टिक टँक उपसा करणे व मैला प्रक्रिया प्रकल्प चालविणे या बाबींचा विचार करता उपयोगिता शुल्क 1% ऐवजी 2% लावणे आवश्यक आहे.

विटा नगरपरिषद हद्दीमध्ये दर तीन वर्षांतून एकदा सेप्टिक टँक उपसा करण्यासाठी येणारा वार्षिक खर्च अंदाजे 45 लक्ष इतका आहे, तर करवाढीतून येणारे (करयोग्य मूल्यावर दोन टक्के (2%) प्रमाणे) उत्पन्न हे रक्कम रुपये 31,72,392/- इतके अंदाजित आहे. तसेच नगरपरिषद मार्फत 100/- रुपये विशेष स्वच्छता कर म्हणून आकारला जातो, या माध्यमातून येणारे उत्पन्न 13,20,000/- इतके आहे. असे मिळून करप्राप्त उत्पन्न हे एकूण 44,92,392/- इतके होते. दर तीन वर्षांतून एकदा सेप्टिक टँक उपसा करण्यासाठी येणारा वार्षिक खर्च व विशेष स्वच्छता कर आणि करवाढीतून येणारे उत्पन्न यामधील तफावत रक्कम रुपये 7,608/- नपा फंड/ बक्षीस रक्कम/ 15 वा वित्त आयोग अनुदान / इतर अनुज्ञेय अनुदान यामधून भागविणे यावा.

तरी शासन निर्णय परिपत्रक क्र. राअस/मैला व्यवस्थापन नरीमन पॉइंट मुंबई 400021/1139 /2022 दिनांक 30/11/2022 नुसार विटा नगरपरिषद येथे Scheduled Desludging ची अंमलबजावणी करणेसाठी मैला व्यवस्थापन शुल्क आकारणेबाबत केलेला ठराव क्र.5 दि.20/04/2023 रद्द करून त्यामधील उपयोगिता शुल्क 1 टक्के ऐवजी 2 टक्के लावणेस मंजुरी देत आहे. यासाठी येणारा खर्च व यातून येणारे उत्पन्न यांची तरतूद अर्थसंकल्पात करणेत यावी. तसेच नियमितपणे मैला उपसा व्यवस्थापन करणेकामी PPP मॉडेलची निवड करणेस व याबाबतची निविदा काढणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा